**१) योजनेचे नांव : महिला लोकप्रतिनिधींचा अभ्यास दौरा आयोजित करणे.**

**योजनेचा उद्देश :** ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषदेमध्ये निवडून आलेल्या महिला लोकप्रतिनिधींना जिल्हा व जिल्ह्याबाहेर पंचायत राज, आदर्श गांव, निर्मल ग्राम, महिला बळकटीकरण, महिला व बाल विकासाचे उपक्रम इत्यादी विषयांची माहिती देण्यासाठी व शासकीय कामात महिलांचा सहभाग वाढविणे, महिलांचा आत्मविश्वास वाढविणे, शासकीय योजना समजावून देणे व ग्रामीण भागापर्यंत शासकीय योजना पोहचवून राबवून घेण्यास महिलांना प्रवृत्त करणे.

***************************************

**२) योजनेचे नांव : महिलांसाठी समुपदेशन केंद्र चालविणे.**

**योजनेचा उद्देश :** १. कुटुंबातील मारहाण, लैंगिक छळ, अत्याचार, विवाहपूर्व मार्गदर्शन व इतर तऱ्हेने त्रासलेल्या तसेच मानसिकदृष्ट्या असंतुलित महिलांना सामाजिक, मानसशास्त्रीय, कायदेशीर समुपदेशनासाठी स्वयंसेवी संस्था मार्फत कामकाज करणे.

२. पिडीत महिलांना कायदेशीर मदत, मानसोपचार तज्ज्ञांची मदत, पोलीसांची मदत मिळवून देणे.

***************************************

**३) योजनेचे नांव : बालवाडी व अंगणवाडी सेविका, मदतनीस, पर्यवेक्षिका यांना पुरस्कार देणे.**

**योजनेचा उद्देश :** बालवाडी व अंगणवाडी सेविका, मदतनीस, पर्यवेक्षिका यांचा सत्कार केल्याने त्यांचे दैनंदिन कामात उत्साह वाढून अंगणवाडी केंद्रातील मुलांकडे काळजीपूर्वक लक्ष देण्यात येईल. मुलांच्या सर्वांगीण विकासाकडे लक्ष देवून कुपोषणाचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल. मुलांचे आरोग्य विषयक बाबीकडे व गुणात्मक दर्जा वाढविणेसाठी अधिक प्रयत्न करतील. मुलांचे सर्वांगीण विकासाचे दृष्टीने व अंगणवाडी केंद्रातील नोंदवह्या कामाबाबत कृतीशील राहतील व कामास प्रोत्साहन देणे.

***************************************

**४) योजनेचे नांव : अंगणवाडी सेविका/मिनी अंगणवाडी सेविका/मदतनीस/पर्यवेक्षिका यांचे प्रशिक्षण.**

**योजनेचा उद्देश :** १. पर्यवेक्षिका, अंगणवाडी सेविका, मिनी अंगणवाडी सेविका, मदतनीस यांना प्रशिक्षण देणे.

२. पर्यवेक्षिका, अंगणवाडी सेविका, मिनी अंगणवाडी सेविका, मदतनीस यांच्या व्यावसायिक कौशल्यांमध्ये सुधारणा करणे.

३. अंगणवाडी सेवांच्या दर्जामध्ये सुधारणा करणे.

४. नव-नविन तंत्रे व पध्दतींशी ओळख करुन देणे, तसेच पालकांना पूर्वशालेय शिक्षणाबाबत जागृत करणे.

***************************************

**५) योजनेचे नांव : पंचायत महिला शक्ती अभियान अंतर्गत पंचायत राज संस्थामधील महिला प्रतिनिधीना प्रशिक्षण व महिला मेळावे व मार्गदर्शन केंद्र.**

**योजनेचा उद्देश :** पंचायत राज संस्थांमध्ये महिलांना ५०% जागा राखीव ठेवण्यात आल्या आहेत. त्याअनुषंगाने त्यांची क्षमताबांधणी होणे आवश्यक आहे. पंचायत महिला शक्ती अभियान अंतर्गत पंचायत राज संस्थांमधील तिन्ही स्तरातील महिला लोकप्रतिनिधींना प्रशिक्षण मिळावे. (उदा. क्रांतीज्योती धर्तीवरील प्रशिक्षण) आयोजित करणे व महिलांसाठी मेळावे घेऊन मार्गदर्शन करणे.

*************************************

**६) योजनेचे नांव : मुलींना स्वसंरक्षणासाठी व त्यांच्या शारीरीक विकासासाठी प्रशिक्षण देणे.**

**योजनेचा उद्देश :** मुली व महिलांवर होत असलेल्या अन्यायाचा प्रतिकार करणेकामी व स्वसंरक्षणासाठी तसेच शारीरीक विकासासाठी ज्युडो कराटे/योगाचे प्रशिक्षण देणे. जेणेकरुन त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण करुन महिलांना सक्षम करण्यासाठी व महिलांवर होत असलेल्या अन्यायाचा प्रतिकार करण्यास हातभार लावणे.

*************************************

**७) योजनेचे नांव : महिलांना कायदेशीर/विधीविषयक सल्ला देणे.**

**योजनेचा उद्देश :** १. शाळा व महाविद्यालयातील किशोरवयीन मुलींचा विकास व सक्षमीकरण व्हावे.

२. किशोरवयीन मुलींना महिला व बालकांविषयीच्या विविध कायदेविषयक तरतुदींची माहिती मिळावी.

*************************************

**८) योजनेचे नांव : कुपोषित मुला-मुलींसाठी व किशोरवयीन मुलींसाठी, गरोदर स्तनदा माता यांना अतिरिक्त आहार.**

**योजनेचा उद्देश :** १) ग्रामीण भागातील अंगणवाडीचे कार्यक्षेत्रातील ६ महिने ते ३ वर्ष व ३ वर्ष ते ६ वर्षे वयोगटातील मुलामुलींना अंगणवाडीमार्फत आहार दिला जातो. या व्यतिरिक्त कुपोषित मुलांचे कुपोषणाचे प्रमाण कमी व्हावे, यासाठी विशेष आहार म्हणून प्रोटीन सिरप/पावडर, मायक्रोन्युट्रीयंन्ट सप्लीमेंटेशन सिरपचा, मिनरल व्हिटॅमिन्सचा पुरवठा करण्यात यावा. तसेच स्थानिक उपलब्धतेनुसार दुध, सोयादुध, चिक्की, लाडू, अंडी, फळे, गुळ, शेंगदाणे इत्यादी पौष्टीक व प्रथिनयुक्त आहार तसेच गर्भवती, स्तनदा माता व किशोरी मुलींसाठी लोहयुक्त गोळ्या देण्यात याव्या. किशोरवयीन म्हणजेच १३ ते १९ वयोगटातील दारिद्र्य रेषेखालील शालेय व शालाबाह्य मुलींना आवश्यक अशा आरोग्यविषयक साहित्याचे मोफत वाटप करण्यात यावे.

२) अंगणवाडीतील ३ ते ६ वर्ष वयोगटातील कुपोषित मुलांना केळी व अंडीचा आवश्यकतेनुसार व स्थानिक परिस्थितीनुसार पुरवठा करुन कुपोषणाचे प्रमाण कमी करणे.

३) सूक्ष्म पोषण तत्वांनी समृध्द पूरक आहार पुरवठा करणे.

**९) योजनेच नांव : अंगणवाडीना विविध साहित्य पुरविणे.**

**योजनेचा उद्देश :** एकात्मिक बाल विकास सेवा योजनेखालील अंगणवाड्यांना एकात्मिक बाल विकास सेवेकडून विविध साहित्य पुरविण्यात येते. मात्र हे साहित्य अपुरे असल्याने अंगणवाडी/मिनी अंगणवाडीतील बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी साहित्याचा पुरवठा करुन बालकांचा सर्वांगीण विकास करणे.

************************************

**१०) योजनेचे नांव : अंगणवाडी इमारत दुरुस्ती देखभाल.**

**योजनेचा उद्देश :** १) अंगणवाडी केंद्रांची दुरुस्ती अंतर्गत सजावट, अनुषंगिक साहित्य, शैक्षणिक वातावरण निर्मिती, रंगरंगोटी, भिंतीपत्रके, आकर्षक चित्रकाम, बोलक्या भिंती तयार करणे तसेच इतर आवश्यक साहित्य पुरवठा करणे.

२) अंगणवाडी केद्रांची आवश्यकतेनुसार दुरुस्ती करणे.

३) अंगणवाडी केंद्रामधील बालकांची उपस्थिती वाढविणे.

४) बालकांचा शैक्षणिक दर्जा उंचावण्यास मदत करणे.

************************************

**११) योजनेचे नांव : ५ वी ते १२ वी पर्यंत शिकणाऱ्या मुलींना दोन चाकी सायकल पुरविणे.**

**योजनेचा उद्देश :** १) ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थीनींना त्यांच्या राहत्या गावापासून शाळेत जा–ये करण्यासाठी सायकल सुविधा उपलब्ध करुन देणे.

२) ग्रामीण भागातील मुलींना शिक्षणासाठी प्रोत्साहन देणे.

**योजनेची कार्यपध्दती व निकष:** १) ग्रामीण व दुर्गम भागातील शाळेपासून जास्त अंतरावरील तथापी शाळा ते घराचे अंतर कमीत कमी २ कि.मी. असणाऱ्या मुलींना प्रथम लाभ देता येईल.

२) इयत्ता ५ वी ते १२ वी पर्यंत शिकणाऱ्या मुलींना सदरचा लाभ देय असून एकाच कुटुंबातील तथापि भिन्न ठिकाणी शाळेत जाणाऱ्या मुलींच्या बाबतीत एका कुटुंबात जास्तीत जास्त २ लाभार्थ्यांना लाभ देता येईल.

३) क्र. १ प्रमाणे लाभार्थी संपल्यानंतर १ कि.मी. किंवा त्यापेक्षा जास्त अंतरावरील विद्यार्थीनींना लाभ देता येईल.

४) सर्वसाधारण लाभार्थ्यांना सदर योजनेचा लाभ देण्यात येईल. परंतु लाभ देताना दारिद्रय रेषेखालील कुटुंबातील विद्यार्थीनीचा प्राधान्याने विचार करण्यात येईल.

५) इ. ५ वी ते इ. १२ वी मध्ये शिकणाऱ्या मुलींना योजनेचा लाभ दिला जाईल.

६) सदरची योजना थेट लाभ हस्तांतरण (डिबीटी) तत्वावर राबविण्यात येईल.

७) लाभार्थ्यांचे अर्ज बाविप्रअ यांचे शिफारशीनुसार स्विकारले जातील.

८) लाभार्थ्यांची अंतिम निवड करण्याचे अधिकार महिला व बाल विकास समितीस राहतील.

९) सदर लाभार्थ्याने यापूर्वी या योजनेचा लाभ घेतलेला नसावा किंवा अन्य

विभागाकडून लाभ घेतला नसल्याची खात्री बालविकास प्रकल्प अधिकारी करतील.

१०) दोन चाकी सायकलचा लाभ नियोजन विभागाचे शासन निर्णय क्र. डीसीटी/२३१६/प्र.क्र. १३३/का.१४१७ दि. ५ डिसेंबर २०१६ अन्वये विविध कल्याणकारी योजनांमध्ये वस्तूरुपाने मिळणाऱ्या लाभाचे हस्तांतर रोख स्वरुपात थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये जमा करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. सदर शासन निर्णयातील परिशिष्ट–अ मध्ये सायकल या वस्तूचा समावेश करण्यात आला आहे. त्यानुसार या विभागाने मंजूर केलेल्या वर्णनानुसार लाभार्थीनीने स्वतः सायकल खरेदी केल्याची शहानिशा प्रकल्प स्तरावर करण्यात येईल. सदर तरतुदीमधून पात्र लाभार्थीनींच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये सायकल या वस्तूची रोख रक्कम गट विकास अधिकारी यांचेमार्फत जमा करण्यात येईल.

**योजनेचा लाभ घेण्यासाठी कोणाकडे संपर्क साधावा** : बाल विकास प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प यांचे मार्फत महिला व बाल विकास विभाग, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग.

**आवश्यक कागदपत्रांच्या प्रती :**

१) विहित नमुन्यातील परिपूर्ण स्वरुपातील अर्ज.

२) जातीचे प्रमाणपत्र (असल्यास)

३) वयाचा दाखला (जन्मदाखला सत्यप्रत, शाळेचे/कॉलेजचे बोनाफाईड प्रमाणपत्र)

४) आधारकार्डाची सत्यप्रत

५) दारिद्र्य रेषेचा दाखला (असल्यास प्राधान्य)

६) बँक खातेपुस्तिकेच्या प्रथम पानाची सत्यप्रत.

**************************************

**१२) योजनेचे नांव** : **महिलांना साहित्य पुरविणे.**

**योजनेचा उद्देश** : ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील महिलांना स्वयंरोजगारासाठी पिठाची गिरणी, शिलाई मशीन, पिको फॉल मशीन, तसेच प्रचलित परिस्थितीनुसार पल्वराईझर (ओले/सुके उळण यंत्र), पशुधन संगोपन, ज्यात शेळीपालन, कोंबड्यापालन, छोटे किराणा दुकान, मिनी दाल मील, घरगुती फळ प्रक्रीया उद्योग, घरगुती मसाला उद्योग साहित्य तत्सम प्रकारचे साहित्य उपलब्ध करुन देणे.

**योजनेची : कार्यपध्दती व निकष**

१) ग्रामीण प्रकल्पातील महिला लाभार्थ्यांना लाभ देण्यात येईल.

२) सदर योजनेंतर्गत प्रती लाभार्थी खरेदी समिती दरानुसार खर्च करण्यात येईल व योजनेच्या मार्गदर्शन सूचनेनुसार १०% लाभार्थी हिस्सा वजा जाता उर्वरीत रक्कम देय राहील. तसेच एका लाभार्थ्यास एकदाच लाभ देय राहिल व त्याबाबत बाल विकास प्रकल्प अधिकारी खात्री करतील.

३) एका वर्षात कुटुंबातील एकाच व्यक्तीस लाभ देणेत येईल.

४) लाभार्थीचे अर्ज बाविप्रअ यांचे शिफारशीनुसार स्विकारले जातील.

५) लाभार्थ्यांची अंतिम निवड करण्याचे अधिकार महिला व बाल विकास समितीस राहतील.

६) दारिद्र्य रेषेखालील लाभार्थी न सापडल्यास रु. १,२०,०००/- पर्यंत वार्षिक उत्पन्न असणाऱ्या महिलांना लाभ देण्यात येईल.

७) या योजनेचे लाभ नियोजन विभागाचे शासन निर्णय क्र. डीसीटी/२३१६/प्र.क्र.१३३/का. १४१७, दि. ५ डिसेंबर २०१६ अन्वये विविध कल्याणकारी योजनांमध्ये वस्तूरुपाने मिळणाऱ्या लाभाचे हस्तांतर, रोख स्वरुपात थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये जमा करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. सदर शासन निर्णयातील परिशिष्ट-अ मध्ये ज्या वस्तूचा समावेश करण्यात आलेला आहे. त्यानुसार या विभागाने मंजूर केलेल्या वर्णनानुसार लाभार्थींनीने स्वतः वस्तू खरेदी केल्याची शहानिशा प्रकल्पस्तरावर करण्यात येईल. सदर तरतुदीमधून पात्र लाभार्थींनीच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये योजनेंतर्गत येणाऱ्या वस्तूची रोख रक्कम गट विकास अधिकारी यांचेमार्फत जमा करण्यात येईल. तसेच उक्त शासन निर्णयातील परिशिष्ट-अ मध्ये (डीबीटी) समाविष्ठ नसलेल्या वस्तू विहित पध्दतीने खरेदी करुन पात्र अर्जदार लाभार्थ्यांना वाटप करण्यात येईल.

८) सदर योजना डीबीटी मध्ये समाविष्ठ आहे. लाभार्थ्यांस आवश्यकतेनुसार पाहिजे ती वस्तू खरेदी करण्याचे स्वातंत्र्य राहील. तथापि देय होणारे अर्थसहाय्य हे वस्तू खरेदीची प्रत्यक्ष किंमतीच्या ९०% रक्कम अथवा खरेदी समितीने निश्चित केलेल्या रक्कम असेल तेवढेच अर्थसहाय्य अनुज्ञेय असेल व याची खात्री बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी करुनच अर्थसहाय्य वितरीत करावे.

**योजनेचा लाभ घेण्यासाठी**

**कोणाकडे संपर्क साधावा.** बाल विकास अधिकारी, एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प यांचेमार्फत महिला व बाल विकास विभाग, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग.

शासकीय अनुदान / लाभार्थी हिस्सा योजनेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार १०% लाभार्थी हिस्सा वजा जाता उर्वरीत रक्कम देय राहील.

**आवश्यक कागदपत्रांच्या प्रती :**

१. विहित नमुन्यातील परिपूर्ण स्वरुपातील अर्ज

२. आधार कार्ड सत्यप्रत

३. बँक खाते पुस्तिका सत्यप्रत

४. जातीचे प्रमाणपत्र असल्यास

५. चालू आर्थिक वर्षातील विद्युत देयक/देयकाची सत्यप्रत

६. अर्जदार महिला विवाहीत/नावात बदल असल्यास विवाह नोंदणी दाखला, गॅझेटची सत्यप्रत इ. ची सत्यप्रत.

७. रेशनकार्डची सत्यप्रत.

८. दारिद्रय रेषेचा दाखला/वार्षिक उत्पन्न १,२०,०००/- च्या आतील असल्याचा दाखल्याची सत्यप्रत.

९. शिलाई मशिन/पिको फॉल मशिन खरेदीकरीता शासन मान्यता प्राप्त व्यावसायिक प्रशिक्षण पुरवठादारामार्फत (Vocational Training Provider) अथवा इतर शासनमान्य संस्थांमार्फत शिवणकाम/फॅशन डिझायनींगचे प्रशिक्षण घेतल्याचे प्रमाणपत्र. याबाबत बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी संस्था शासनमान्य असल्याचे प्रमाणित करावे.

***********************************

**१३) योजनेचे नांव : मुलींना व महिलांना व्यावसायिक व तांत्रिक प्रशिक्षण देणे.**

**योजनेचा उद्देश :**

अ) मुलींना व महिलांना रोजगारक्षम तयार करणे.

ब) मुली व महिलांची आर्थिक व सामाजिक पातळी उंचाविणे.

**योजनेची कार्यपध्दती : व निकष**

अ) १. मान्यताप्राप्त संस्थेत प्रशिक्षण घेणाऱ्या महिलांना रु. ५०००/- पर्यंत प्रशिक्षण फी. प्रशिक्षण पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र सादर केल्यानंतर देण्यात येईल. रु. ५०००/- किंवा प्रत्यक्ष प्रशिक्षण फी च्या ९०% या पैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम लाभार्थ्यांस देय राहिल.

२) प्रशिक्षण कार्यक्रम कालावधी जास्तीत जास्त एक वर्षाचा असावा.

३) चालू आर्थिक वर्षाच्या लगतच्या अगोदरच्या १ जानेवारी पासूनचे चालू आर्थिक वर्ष अखेरपर्यंत योजना कालावधी अर्ज स्विकृतीस ग्राह्य धरण्यात येईल. व्यक्तिमत्व विकास, ब्युटी पार्लर प्रशिक्षण, केटरींग, बेकींग अशा विशिष्ट पध्दतीचे स्वयंपाकाचे प्रशिक्षण, दुग्धजन्य पदार्थांचे उत्पादन, फुड प्रोसेसिंग, शिवणकाम व फॅशन डिझायनींग प्रशिक्षण, संगणक दुरुस्ती, मोटार ड्रायव्हिंग, मराठी/हिंदी टायपिंग, इमिटेशन ज्वेलरी मेकींग, लघुलेखन, सेल्स गर्ल, विमा एजंट, परिचारिका प्रशिक्षण, घनकचरा प्रशिक्षण. बायोगॅस (कचऱ्यापासून खत निर्मिती, गांडुळखत, कचऱ्याचे विभाजन व व्यवस्थापन) रोपवाटीका तसेच शोभीवंत फुलझाडांची व औषधी वनस्पतीची लागवड व विक्री इत्यादी प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केलेल्या मुलींना/महिलांना या योजनेचा लाभ देण्यात येईल.

४) लाभार्थींचे अर्ज बाविप्रअ यांचे शिफारशीसह स्विकारणेत येतील.

५) लाभार्थींची अंतिम निवड करण्याचे अधिकार महिला व बाल विकास समितीस राहतील.

६) सदर लाभार्थ्यांनी यापूर्वी या योजनेचा लाभ घेतलेला नसावा किंवा अन्य विभागांकडून लाभ घेतला नसल्याची खात्री बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी करावी.

ब) १. प्रकल्प स्तरावर विविध ठिकाणी स्पर्धा परिक्षेचे मार्गदर्शन शिबीर आयोजित करणे.

२) शाळा/महाविद्याल स्तरावर शिबीर आयोजित करावे.

३) दोन तज्ञ प्रशिक्षक नेमणेत येतील व त्यांना प्रती प्रशिक्षणास रु. ५००/- मानधन अदा करणेत येईल.

४) स्पर्धा परिक्षांशी संबंधित प्रदर्शनी तयार करण्यात यावे.

५) चहा/अल्पोपहार इ. व्यवस्था आवश्यकतेनुसार करण्यात यावी.

**योजनेचा लाभ घेण्यासाठी कोणाकडे संपर्क साधावा -**

बाल विकास प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प.. यांचे मार्फत महिला व बाल विकास विभाग, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग.

शासकीय अनुदान/लाभार्थी हिस्सा. रक्कम रु. ५०००/- किंवा प्रत्यक्ष प्रशिक्षण फी च्या ९०% या पैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम लाभार्थ्यास देय राहिल.

**आवश्यक कागदपत्रांच्या प्रती :**

१. विहित नमुन्यातील परिपूर्ण स्वरुपातील अर्ज.

२. उक्त नमूद यादीतील चालू आर्थिक वर्षाच्या लगतच्या अगोदरच्या १ जानेवारी पासूनचे, चालू आर्थिक वर्ष अखेर पर्यंतच्या कालावधीत कोणतेही एक प्रशिक्षण परीक्षा उत्तीर्ण झाल्याच्या प्रमाणपत्राचा स्वप्रमाणित प्रत/ सत्यप्रत.

३. वयाचा दाखला (जन्मदाखला सत्यप्रत, शाळेचे/कॉलेजचे बोनाफाईड प्रमाणपत्र)

४. विवाहित महिलांच्या, नाव बदललेल्या महिलांच्या बाबतीत विवाह नोंदणी प्रमाणपत्र, रेशनकार्ड, गॅझेटची सत्यप्रत.

५. आधार कार्ड सत्यप्रत.

६. बँक खाते पुस्तिका सत्यप्रत.

७. लाभार्थ्यांने प्रत्यक्ष भरलेल्या फीच्या पावतीची सत्यप्रत.

**मुलींना व महिलांना व्यावसायिक व तांत्रिक प्रशिक्षण देणे ही योजना राबविण्याबाबतची कार्यपध्दती.**

ग्राम विकास विभागाकडील शासन निर्णय क्रमांक झेडपीए-२०१३/प्र.क्र. ७६/ पंरा-१ दि. २४ जानेवारी २०१४ च्या अधीन राहून खालीलप्रमाणे करण्यात येईल.

**मुलींना व महिलांना व्यावसायिक व तांत्रिक प्रशिक्षण :**

महिला व मुलींना व्यावसायिक व तांत्रिक प्रशिक्षणासाठी सुविधा उपलब्ध व्हावी म्हणून व्यावसायिक व तांत्रिक प्रशिक्षणाच्या योजना राबविण्यात येतात. केंद्र शासनाने उद्योजकता विकास व तांत्रिक प्रशिक्षण , कौशल्य वृध्दी उपक्रम, व्यावसायिक प्रशिक्षण कार्यक्रम इ. योजनेंतर्गत व त्यांच्यामार्फत प्रशिक्षीत झालेल्या लाभार्थी मुली/महिलांना या योजनेंतर्गत लाभ देण्यात येईल. व्होकेशनल ट्रेनिंग प्रोव्हायडर मार्फत व खालील प्रशिक्षण घेतलेल्या मुली/महिलांना या योजनेंतर्गत लाभ देण्यात येईल.

१. व्यक्तिमत्व विकास

२. ब्युटी पार्लर प्रशिक्षण

३. कॅटरींग, बेकींग अशा विशिष्ट पध्दतीच्या स्वयंपाकाचे प्रशिक्षण

४. दुग्धजन्य पदार्थांचे उत्पादन

५. फूट प्रोसेसिंग, शिवणकाम

६. फॅशन डिझायनींग प्रशिक्षण

७. संगणक दुरुस्ती

८. मोटार ड्रायव्हींग

९. मराठी/इंग्रजी टायपिंग

१०. इमिटेशन ज्वेलरी मेकींग

११. लघुलेखन

१२. सेल्स गर्ल, विमा एजंट, परिचारीका (नर्सिंग) प्रशिक्षण

१३. घनकचरा प्रशिक्षण व बायोगॅस (कचऱ्यापासून खत निर्मिती, गांडूळखत कचऱ्याचे विभाजन व व्यवस्थापन) रोपवाटीका तसेच शोभीवंत फुलझाडांची व औषधी वनस्पतींची लागवड व विक्री उपरोक्त नमूद केलेल्या कोर्सेसचे प्रशिक्षण घेतलेल्या मुली व महिलांना लाभ देण्यात येईल. या योजनेखाली मान्यताप्राप्त संस्थेत प्रशिक्षण घेणाऱ्या महिलांना प्रति लाभार्थी रु. ५०००/- पर्यंत महिला व बाल विकास समितीस खर्च करता येईल. प्रशिक्षण शुल्काच्या १०% रक्कम लाभार्थ्याने स्वतः भरणे आवश्यक आहे. प्रशिक्षण कालावधी जास्तीत जास्त एक वर्ष असणे आवश्यक राहील.

अ) प्रशिक्षणासाठी मंजूर असलेल्या रकमेपैकी १०% लाभार्थी हिस्सा लाभार्थ्याने भरावयाचा असून प्रशिक्षण पूर्ण केलेल्या लाभार्थ्यांच्या बँकेच्या खात्यामध्ये उर्वरीत रक्कम जमा करण्यात येईल.

ब) दारिद्र्य रेषेखालील लाभार्थ्यांचा प्राधान्याने विचार करता येईल.

क) शासनमान्य संस्थेकडून प्रशिक्षण उत्तीर्ण केल्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

ड) चालू आर्थिक वर्षाच्या अगोदर आणि लगतचा १ जानेवारी ते चालू आर्थिक वर्षाअखेर पर्यंतचा कालावधी अर्ज स्विकारण्यात ग्राह्य समजण्यात येईल. प्रशिक्षण घेतलेल्या लाभार्थ्यांनी संबंधित बाल विकास प्रकल्प अधिकारी कार्यालयाकडे अर्ज सादर करणे आवश्यक राहील.

ई) लाभार्थींचे अर्ज बाविप्रअ यांचे शिफारशीसह स्विकारण्यात येतील.

उ) लाभार्थीची अंतिम निवड करण्याचे अधिकार महिला व बाल कल्याण समितीस राहतील.

*********************************

**१४) योजनेचे नांव : सातवी ते बारावी पास मुलींना संगणक प्रशिक्षण देणे.**

**योजनेचा उद्देश :** १) ग्रामीण भागातील इ.७ वी ते इ.१२ वी पास मुलींना संगणक प्रशिक्षण देऊन स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी मदत करणे.

२) इ. ७ वी ते इ. १२ वी पास मुलींना एम.एस-सीआयटी, सी.सी.सी. संगणक प्रशिक्षण देणेत येईल.

३) प्रशिक्षण घेण्यासाठी लाभार्थींना दोन पर्याय उपलब्ध राहतील.

अ) मान्यताप्राप्त संस्थेकडून प्रशिक्षण घेतले असल्यास विहित नमुन्यात अर्ज सादर करणे.

ब) प्रशिक्षणासंदर्भात संस्था नेमण्यात आल्यास सदर संस्थेमार्फत प्रशिक्षण घेणे.

४) चालू आर्थिक वर्षाच्या लगतच्या अगोदरच्या १ जानेवारी पासूनचे चालू आर्थिक वर्ष अखेरपर्यंत योजना कालावधी या कालावधीत संगणक प्रशिक्षण उत्तीर्ण झालेल्या मुलींना लाभ देण्यात येईल.

५) संगणक प्रशिक्षण उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र सादर केल्यानंतर नियमानुसार संगणक प्रशिक्षणाचे शुल्क थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी) नुसार आधार संलग्न बँक खात्यावर जमा करण्यात येईल.

६) लाभार्थीचे अर्ज बाविप्रअ यांचे शिफारशीनुसार स्विकारले जातील.

७) लाभार्थींची अंतिम निवड करण्याचे अधिकार महिला व बालविकास समितीस राहतील.

८) प्रशिक्षण मान्यताप्राप्त संस्थांमार्फत आयोजित केलेले असल्यास लाभ देण्यात येईल.

९) इच्छुक संस्थांसोबत करार करुन योजना राबविता येईल व प्रशिक्षणाची रक्कम लाभार्थ्यांच्या खात्यावर वर्ग करण्यात येईल.

१०) सदर लाभार्थ्याने यापूर्वी या योजनेचा लाभ घेतलेला नसावा किंवा अन्य विभागाकडून लाभ घेतला नसल्याची खात्री बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी करावी.

**योजनेचा लाभ घेण्यासाठी कोणाकडे संपर्क साधावा -**

बालविकास प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प - यांचेमार्फत महिला व बाल विकास विभाग, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग.

**आवश्यक कागदपत्रांच्या प्रती :**

१) विहित नमुन्यातील परिपूर्ण स्वरुपातील अर्ज

२) दारिद्रय रेषेचा/वार्षिक उत्पन्नाचा दाखला (रु. १,२०,०००/- पर्यंतच्या उत्पन्नाचा दाखला असल्यास प्राधान्य) वैकल्पिक

३) एम.एस-सीआयटी, सीसीसी संगणक प्रशिक्षण परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे चालू आर्थिक वर्षाच्या लगतच्या अगोदरच्या १ जानेवारी पासूनचे चालू आर्थिक वर्ष अखेर

पर्यंत योजना कालावधी. या कालावधीमधील स्वयंप्रमाणित प्रमाणपत्र/सत्यप्रत.

४) बँक खातेपुस्तिकेची स्वप्रमाणित/सत्यप्रत

५) आधार कार्डाची स्वप्रमाणित/सत्यप्रत

६) जात प्रमाणपत्र असल्यास

७) शैक्षणिक अर्हता प्रमाणपपत्र/शाळा/कॉलेजचे बोनाफाईड सर्टीफिकेट

८) लाभार्थ्याने प्रत्यक्ष भरलेल्या फी च्या पावतीची सत्यप्रत.

*****************************************

**१५) योजनेचे नांव** : **विशेष प्राविण्य मिळविलेल्या मुलांचा व मुलींचा सत्कार करणे.**

**योजनेचा उद्देश** : राज्यस्तर क्रिडा, कला, शिक्षण अशा विविध क्षेत्रात विशेष प्राविण्य मिळविलेल्या मुलांचा व मुलींचा सत्कार करणे, १८ वर्षाच्या आतील मुलांचा व मुलींचा सत्कार करण्यात यावा व त्यांना १०वी व १२वी नंतरच्या उच्च शिक्षणासाठी आवश्यक आर्थिक मदत करणे.

**योजनेची कार्यपध्दती** : १) सदरच्या योजनेचा लाभ ग्रामीण क्षेत्रातील मुलांना व मुलींना देता येईल.

२) ज्या मुलाना व मुलींना क्रिडा, कला, शिक्षण क्षेत्रात, राज्यस्तरावर, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर प्राविण्य मिळविलेले आहे, अशाच मुला व मुलींना सदर योजनेचा लाभ देण्यात येईल.

३) प्रस्ताव बाविप्रअ यांच्या शिफारसीने जिल्हास्तरावर मागविणेत येतील. क्रिडा क्षेत्रातील प्राविण्य मिळविलेल्या मुलांचे व मुलींचे प्रस्तावाची जिल्हा क्रिडा अधिकारी यांचेमार्फत खात्री करण्यात येईल.

४) प्राप्त प्रस्तावातून महिला व बाल कल्याण समिती पुरस्कारासाठी लाभार्थीनींची निवड करेल.

५) पुरस्काराची रक्कम निश्चित केलेल्या रकमेनुसार देण्यात येईल.

६) इ. १० वी व १२ वी नंतरच्या उच्च शिक्षणासाठी दारिद्र्य रेषेखोलील मुलांना व मुलींना आवश्यक आर्थिक मदत करणे, यासाठी महिला बाल कल्याण समिती लाभार्थीची निवड करताना रक्कम निश्चित करेल.

७) सदर रक्कम लाभार्थीनींच्या बँक खात्यामध्ये जमा करण्यात येईल.

८) सदर लाभार्थ्याने यापूर्वी या योजनेचा लाभ घेतलेला नसावा.

**प्रोत्साहनात्मक रोखलाभ :** समितीने वेळोवेळी मान्य केल्याप्रमाणे देण्यात येईल.

**योजनेचा लाभ घेण्यासाठी कोणाकडे संपर्क साधावा -**

बालविकास प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प - यांचेमार्फत महिला व बाल विकास विभाग, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग.

**आवश्यक कागदपत्रांच्या प्रती :**

१) विहित नमुन्यातील परिपूर्ण स्वरुपातील अर्ज

२) कला, क्रीडा स्पर्धांमध्ये राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय/राज्यस्तरावर प्राविण्य मिळालेल्या मुला–मुलींना चालू आर्थिक वर्षाच्या लगतच्या अगोदरच्या १ जानेवारी पासूनचे चालू आर्थिक वर्ष अखेरपर्यंत योजना कालावधी या कालावधीत प्रमाणपत्राची स्वप्रमाणित प्रत / सत्यप्रत.

३) वयाचा दाखला (जन्मदाखला सत्यप्रत, शाळेचे/कॉलेजचे बोनाफाईड प्रमाणपत्र)

४) बँक खातेपुस्तिकेची स्वप्रमाणित/सत्यप्रत.

५) दारिद्र्य रेषेचा/वार्षिक उत्पन्नाचा दाखला (रु. १,२०,०००/– पर्यंतचे वार्षिक उत्पन्न) असल्यास त्याची सत्यप्रत.

६) आधार कार्ड सत्यप्रत

७) स्पर्धा आयोजक/क्रीडा संघटना शासनमान्य असल्याबाबत संबंधितांचे प्रमाणपत्र (असल्यास)

*************************************

**१६) योजनेचे नांव** : **किशोरवयीन मुलींना सॅनिटरी नॅपकीन पुरविणे.**

**योजनेचा उद्देश** : १) ग्रामीण क्षेत्रातील ११ ते १८ या वयोगटातील शालेय तसेच इतर /शाळाबाह्य मुलींमध्ये आरोग्यविषयक जाणीव निर्माण करणे.

२) किशोरींमध्ये सॅनिटरी नॅपकीनच्या वापरास चालना देणे.

३) किशोरींमध्ये मासिक पाळीबाबत जाणीव जागृती करणे.

## ⁕ वैयक्तिक लाभाचे अर्ज नमुने ⁕

⁕ शाळेत जाणाऱ्या मुलींना (इ. ७ वी ते १२ वी) सायकल पुरवठा

⁕ शिलाई मशीन खरेदीनंतर प्रतिपूर्ती मिळण्याबाबतचा अर्ज

⁕ महिलांना साहित्य पुरवठा प्रतिपूर्ती मिळण्याबाबतचा अर्ज

⁕ मुलींना व महिलांना व्यावसायिक व तांत्रिक प्रशिक्षण

⁕ संगणक (MSCIT/CCC) प्रशिक्षण

*************************************

# नवीन समाविष्ट योजना

## १) योजनेचे नांव : घरकुल योजना

उद्देश : घटस्फोटीत व परित्यक्त्या या व्यतिरिक्त गरजू महिला या ऐवजी घटस्फोटीत व परित्यक्त्या या व्यतिरिक्त गरजू महिला तसेच राज्यातील भिक्षेकरी गृहातून सुटका होवून जिल्ह्यात पुनर्वसनासाठी वास्तव्यास आलेल्या ज्या महिलांकडे हक्काचे घर नाही, अशा दारिद्र्य रेषेखालील व वार्षिक उत्पन्न रु. ५०,०००/- या ऐवजी रु. १,२०,०००/- पर्यंत असणाऱ्या महिलांना हक्काचा निवारा मिळावा म्हणून रु. ५०,०००/- पर्यंत घरकुलासाठी खर्च देणे.

## २) अनाथ मुलांसाठी शालेय साहित्य खरेदीसाठी अर्थसहाय्य :

उद्देश : अनाथ अथवा एकल पालक आई किया वतीला असलेल्या सरोव अंगणवाडी इयत्ता १० वी पर्यंतच्या मुलीसाठी शालेय साहित्य, पार, शालयकीय इतर आवश्यक ----- रु. २०००/- पर्यंत अर्थसहाय्य देण्यात यावे. सदर योजनेचा लाभ ज्या मुलींच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रु. १,२०,०००/- पर्यंत असेल अशांना देण्यात येईल.

## ३) प्रचार व प्रसिध्दी :

उद्देश : महिला व बाल कल्याण विभागास योजनेंतर्गत प्राप्त होणाऱ्या एकूणा रक्कमेच्या ५% किंवा रु. २५.०० लक्ष पर्यंतची रक्कम सदर योजनांच्या प्रचार, प्रसिध्दी व दस्तऐवजीकरणासाठी यासाठी खर्च करण्यात येईल.

## ४) मुलींना कन्यादान साहित्य वाटप करणे :

उद्देश : दारिद्र्य रेषेखालील कुटुंब तसेच ज्या कुटुंबाची उत्पन्नाची मर्यादा रु. १,२०,०००/- पर्यंत आहे अशा कुटुंबातील मुलींना विवाहाप्रित्यर्थ कन्यादान साहित्य खरेदीस अर्थसहाय्य करणे.

***